


Title Code- MAHMAR-51647

# दैनिक निडर निर्भिड जनसंचलन

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com




वर्ष २ रे | अंक : ६१६ . वा | शनिवार | दि. ०२ डिसेंबर २०२३ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# भाजप पदाधिकाऱ्यांमधील नियुक्तीचा वाद गंभीर की चहाच्या पेल्यातील वादळ?

## निष्क्रिय शहराध्यक्ष बदलला तर बिघडले कुठे, पदाधिकाऱ्यांचा सवाल...

जनसंचलन/ बुलढाणा

गेल्या काही दिवसांपासून जिल्ह्याच्या घाटावरील भाजपच्या पदाधिकाऱ्यांमध्ये नियुक्त्यांवरून मोठा वाद असल्याचे दिसून येत आहे. इच्छुकांची संख्या जास्त आणि पदांची संख्या कमी असली की हे होणारच, यात दुमत नाही. परंतु माध्यमातून या वादाचा जो बोभाटा करण्यात येत आहे, तो वाद खरंच तेव्हढा गंभीर आहे का, की हे चहाच्या पेल्यातील वादळ ठरणार, हे येत्या काळात स्पष्ट होणार आहे. परंतु नव्या बुलढाणा शहराध्यक्षांच्या नियुक्तीवर अकारण वाद होत असल्याचा. तसेच **पूर्वीचे निष्क्रिय अध्यक्ष** बदलून नव्या दमाचा शहराध्यक्ष नियुक्त केला तर बिघडले कुठे, असा प्रश्न भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित करीत आहेत. भारतीय जनता पक्षाचे बुलढाणा जिल्ह्यात अनेक दशकांपासून मजबूत संगठन आहे. एकेकाळी भाऊसाहेब फुंडकर हे जिल्हा भाजपचा एक समर्थ चेहरा होते. परंतु त्यांच्या निधनानंतर जिल्हा भाजपमध्ये फारसा असा कोणी आश्वासक चेहरा दिसून आला नाही. नाही म्हटले तरी जिल्ह्यात भाजपचे तीन-तीन आमदार आहेत. यातील दोन घाटाखाली आहेत. तर श्वेता महाले या चिखलीच्या आमदार आहेत. त्या आपल्या मतदारसंघात पूर्ण ताकदीनिशी निधी खेचून आणण्याचे काम करीत आहेत. त्यांच्या इतकी सक्रियता भाजपच्या इतर दोन आमदारांना साधता आलेली नाही. **आकाश फुंडकर** यांची निष्क्रियता तर संपूर्ण जिल्ह्यातच शर्वश्रुत आहे. यातच घाटावरील जिल्हा भाजपमध्ये काही महिन्यांपूर्वी खांदेपालट झाला आणि गणेश मान्टे हे भाजपचे जिल्हाध्यक्ष झाले. जिल्हाध्यक्षा झाल्यानंतर साहजिकच त्यांनी नव्या पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या सुरू केल्या आहेत. अशातच जिल्ह्याचे ठिकाण असलेले बुलढाणा शहराध्यक्षपदी त्यांनी जिल्ह्यात जनसंपर्क दांडगा असलेले माजी आमदार तथा भाजपा लोकसभा निवडणूक प्रमुख विजयराज शिंदे यांचे खंदे समर्थक असलेले **अनंता शिंदे** यांची नियुक्ती केली. ही नियुक्ती करताच भाजपच्या दुसऱ्या गोटात खदखद व्यक्त होत आहे. खरे तर अशी खदखद होण्याची काही एक आवश्यकता नाही. कारण शिंदे यांची नियुक्ती करण्याआधी बुलढाणा **भाजपचे शहराध्यक्ष सिद्धार्थ शर्मा हे संघटनिक दृष्ट्या एक अत्यंत निष्क्रिय व्यक्तिमत्व होते.** शर्मा यांच्या कार्यकाळात कोणताही विधायक कार्यक्रम नाही, आंदोलन नाही, कुठलीही सक्रियता नाही, अशी स्थिती होती. कोण्याही पक्षाचा सामान्य कार्यकर्ता हा सक्रिय राहण्यासाठी पक्षाकडून सातत्याने काही ना काही कार्यक्रम घेत राहणे आवश्यक असते. परंतु **सिद्धार्थ शर्मा** यांच्याकडून कोणतीही सक्रियता नव्हती. शहर भाजपला कोणी चेहरा आहे की नाही, अशी स्थिती होती. जेंव्हापासून माजी आमदार विजयराज शिंदे यांनी भाजपमध्ये प्रवेश केला, तेंव्हापासून घाटावरील भाजपमध्ये सातत्याने काही ना काही सक्रियता दिसून येत होती. विजयराज शिंदे हे निष्क्रियपणे








बसून राहणारे व्यक्तिमत्व नाही. आमदारपदापासून गेल्या जवळपास नऊ वर्षांपासून दूर असले तरी विजयराज शिंदे यांचे सततचे दौरे, कार्यकर्त्यांशी संवाद, विविध विकासकामांसाठी मंत्र्यांकडे व अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा, असा त्यांचा उद्योग सुरूच असतो. परंतु हे होत असताना जेथे विजयराज शिंदे यांचे वास्तव्य आहे, त्याठिकाणी भाजप अत्यंत मुर्च्छितावस्थेत दिसून येत होता. त्यामुळेच कदाचित विजयराज शिंदे यांनी आपल्या व्यक्तिगत पातळीवर अनंता शिंदे यांच्या शहराध्यक्षपदी नियुक्तीसाठी प्रयत्न केले असतील, तर त्यासाठी इतरांचा पोटशूळ होण्याची काहीच गरज नाही. **जुन्या निष्क्रिय** पदाधिकाऱ्यांची उचलबांगडी करून नव्या दमाच्या रक्ताला पक्षात स्थान दिले नाही तर पक्षात एक साचलेपणा येतो. त्यामुळे ही प्रक्रिया अनिवार्य आहे. लोकसभेच्या निवडणुका सध्या अंगणापर्यंत येऊन ठेपल्या आहेत. पुढील काही महिन्यात या निवडणुका उंबरठ्यापर्यंतही येतील. त्यामुळे आधीच कार्यकारिणीत बदल करून आणि **जुन्या निष्क्रिय** पदाधिकाऱ्यांना बाजूला करून पक्षात साफसफाई केली तर बिघडले कुठे, असा प्रश्नदेखील उपस्थित होत आहे. काही माध्यमांमध्ये भाजपतील अंतर्गत गटबाजीच्या अतिरंजीत बातम्यांची मांडणी करण्यात येत असल्याचे भाजपच्या काही पदाधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. आगामी निवडणुकांमध्ये चांगला परफॉर्मन्स द्यायचा असेल, तर नव्या दमाच्या पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या आवश्यक आहेत, अशी चर्चा सध्या भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते करताना दिसून येत आहे.

# ३० हजाराची लाच घेतांना मोताळ्याचा तलाठी एसीबीच्या जाळ्यात!

जनसंचलन/मोताळा

सरकारकडून स्वच्छ प्रशासनाच्या कितीही बाता हाणल्या जात असल्या तरी काही सरकारी अधिकारी खायचे सोडत नाहीत. ते अधिकारांचा गैरवापर करून सामान्यांना लुटतात. माया जमवतात.. मात्र कधीतरी त्यांच्या पापाचा घडा भरतोच. मोताळा तहसील कार्यालयात तलाठी असलेल्या किशोर कऱ्हाळेच्या बाबतीतही तेच घडल... त्याला ३० हजार रुपयांची लाच घेतांना अमरावती एसीबी पथकाने रंगेहाथ पकडले..१ डिसेंबरला मोताळा साझा कार्यालयात हा प्रकार घडला..

याबाबत वृत्त असे की, मोताळा तालुक्यातील रोहिणखेड येथील ६१ वर्षीय व्यक्तीने त्यांच्या शेतजमिनीच्या हिस्सेवाटणीचे प्रकरण तलाठी किशोर कऱ्हाळे याच्याकडे दाखल केले होते. त्यासाठी कऱ्हाळे याने ३० हजार रुपयांची लाच मागितली. त्यामुळे सदर शेतकऱ्याने अमरावतीच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे (एसीबी) याप्रकरणाची तक्रार केली. तक्रारीची सत्यता पडताळणी केल्यानंतर १ डिसेंबरच्या सायंकाळी सा-पळा रचून तलाठी कऱ्हाळे याला रंगेहाथ पकडण्यात आले. त्याच्याविरुद्ध बोराखेडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसमाने



त्यांचे कोणतेही शासकीय काम करुन देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास तात्काळ लाच लुचपत प्रतिबंधक विभागाला संपर्क साधावा.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# कर्मचाऱ्यांचे अन्यायकारक निलंबन मागे घ्या - अन्यथा सीईओंच्या दालनात ठिय्या...

## वंचित युवा आघाडीचा सीईओंना सात दिवसांचा अल्टिमेटम...

जनसंचलन/बुलढाणा

ग्रामविकास अधिकारी व शिक्षकावर केलेली निलंबनाची अन्यायकारक कारवाई मागे घ्यावी; अन्यथा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या दालनात ठिय्या आंदोलन करण्यात येईल, असा इशारा वंचित बहुजन युवा आघाडीचे जिल्हाध्यक्ष सतीश पवार यांनी दिला आहे. .निलंबन मागे घेण्याकरिता ७ दिवसांचा अल्टिमेटम देण्यात आला असून, तसे निवेदन वंचित बहुजन युवा आघाडीच्या वतीने देण्यात आले आहे. निवेदन देताना जिल्हा संघटक बाला राऊत, जिल्हा महासचिव अर्जुन खरात, विधि सल्लागार ॲड. एस.एस. सुरडकर, जी.एस. गवई, जि.प. सर्कलप्रमुख अनिल पारवे उपस्थित होते. काही दिवसांपूर्वी ग्रामविकास अधिकारी ज्योती मगर व शिक्षक रविकांत जाधव यांच्यावर बेकायदेशीररित्या निलंबनाची कारवाई करण्यात आली. सदरील कर्मचारी निष्कलंक आहेत. त्यांच्यावर आजपर्यंत कुठल्याही प्रकारचे आरोपदेखील झाले नाहीत. त्यांची बाजू ऐकून न घेता वरिष्ठ अधिकाऱ्यांनी राजकीय नेत्यांच्या दबावात येऊन घाईघाईत ही कारवाई केल्याचा आरोप सतीश पवार यांनी केला आहे. जि.प.च्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी निष्पक्ष चौकशी करून



निलंबनाची कारवाई रद्द करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. येत्या ७ दिवसांमध्ये सकारात्मक भूमिका घ्यावी; अन्यथा संविधानिक मार्गाने ६ डिसेंबर रोजी सीईओंच्या दालनात ठिय्या आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा सतीश पवार यांनी दिला आहे.

# ग्राहक उपभोक्ता संरक्षण समितीच्या चिखली तालुका अध्यक्षपदी महेंद्र हिवाळे यांची निवड !

जनसंचलन/ चिखली

संपूर्ण देशभरामध्ये कार्यरत असलेल्या व ज्या ठिकाणी ग्राहकांची फसवणूक होते अशा ग्राहकांना योग्य मार्गदर्शन करून त्यांना न्याय मिळवून देणाऱ्या भारत सरकार नोंदणीकृत असलेल्या ग्राहक उपभोक्ता संरक्षण समितीच्या चिखली तालुका अध्यक्षपदी पत्रकार सामाजिक कार्यकर्ते महेंद्र तुकाराम हिवाळे यांची निवड करण्यात आली. सदर नियुक्ती ग्राहक उपभोक्ता संरक्षण समितीचे संस्थापक अध्यक्ष दादासाहेब केदारे यांनी दि. . २४ नोव्हेंबर रोजी नियुक्तीपत्र देऊन केली आहे, आतापर्यंत सदर समितीचे माध्यमातून जिल्हा मध्ये २५ तक्रारी चा निवारण करण्यात आले असून अनेक फसवणूक झालेल्या ग्राहकांना पदाधिकाऱ्यांनी न्याय मिळवून दिला



आहे. यावेळी आपण समितीच्या माध्यमातून ज्या ग्राहकांचे फसवणूक झाली असेल अशा ग्राहकांना योग्य मार्गदर्शन करून त्यांना न्याय कसा मिळेल यासाठी प्रयत्न करू अशी सुद्धा यावेळी नवनियुक्त तालुका अध्यक्षपदी निवड झालेले महेंद्र तुकाराम हिवाळे यांनी सांगितले आहे. त्यांच्या या निवडीमुळे त्यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

# भारतीय जनता पार्टीच्या कामगार मोर्चाच्या तालुका सचिव पदी शेषराव गावंडे यांची नियुक्ती

जनसंचलन/ बुलढाणा

बुलढाणा येथील शेषराव गावंडे यांची भारतीय जनता पार्टीच्या कामगार मोर्चा भाजप बुलढाणा तालुका सचिव पदी दि १ डिसेंबर रोजी भाजप नेते माजी आमदार विजयराज शिंदे यांच्या कार्यालयावर निवड करण्यात आली आहे. संघटन कौशल्याने जिल्ह्यात भाजपा कामगार मोर्चाचे संघटन वाढविण्यासाठी प्रयत्न करा.कामगार तसेच मजुरांच्या विविध मागण्याबाबत आवाज उठवुन त्यांना न्याय मिळवुन देण्यासाठी



प्रयत्नशिल असावेत.कामगार वर्गातील जास्तीत जास्त बांधवांना भाजपाकडे जोडण्यासाठी आपण अथक परिश्रम घ्या. तसेच भावी वाटचालीस पक्षाच्यावतीने शुभेच्छा देण्यात आल्या.

# भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन...

जनसंचलन/बुलढाणा

विश्वरत्न बोधिसत्व पं.पू.भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त भव्य रक्तदान शिबिर व अभिवादन कार्यक्रम राष्ट्रपिता महात्मा जोतीराव फुले व विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती बुलडाणा च्या वतीने दि ६ डिसेंबर रोजी रक्तदान शिबिर हे सकाळी ९ ते २ वाजेच्या सुमारास तर अभिवादन कार्यक्रम सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास गांधी भवन जयस्तंभ चौक बुलढाणा येथे आयोजित करण्यात आला आहे.

शहरातील व परिसरातील सर्व नागरिकांनी या कार्यक्रमाला जास्तीत जास्त मोठ्या संख्येने उपस्थित राहुन आपले सहकार्य करावे असे आवाहन राष्ट्रपिता महात्मा जोतीराव फुले व विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर



सार्वजनिक जयंती उत्सव समिती बुलडाणाच्या वतीने करण्यात आले आहे.

# उमरद येथे ग्रामसभा संपन्न...

जनसंचलन/ सिंदखेडराजा

तालुक्यातील उमरद येथे ३० नोव्हेंबरला सरपंच निर्मला पंढरीनाथ उबाळे यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामपंचायत जवळील देवीच्या मंदिरासमोरील सभा मंडपामध्ये ग्रामसभा संपन्न झाली. सचिव विनोद सातपुते यांनी विशेष सूची चे वाचन करून अनेक विषयावर चर्चा करण्यात आली, यावेळी मतदार यादीचे पुनर्नरीक्षण करणे बाबत यामध्ये निवडणुकीच्या अनुषंगाने मतदार याद्या अद्यावत करण्याचे काम सुरू आहे त्यामुळे मतदार यादी मधील मयत मतदारांची नावे कमी करणे, अठरा वर्षे पूर्ण झालेल्या मतदारांचे नाव समाविष्ट करणे, महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेचे लेबर बजेट तयार करणे, रमाई आवास योजना, मोदी आवास योजना, कृषी विभागाच्या वतीने पोखरा योजनेबाबत माहिती सांगण्यात आली, यावेळी सभेला प्रभाकर देशमुख, विठ्ठल बांबरगे, अरुण घायवट, दत्तू सानप, आनंदी शिनगारे, मनोहर देशमुख, राजू शिनगारे, पंढरीनाथ उबाळे, कृषी सहाय्यक मुंडे, संतोष गिरी, कोतवाल ढाकणे, सचिव विनोद सातपुते, ग्रामपंचायत कर्मचारी संजय कारभारी मुळे, संजय साहेबराव मुळे, अंगणवाडी सेविका, यांच्यासह गावकरी हजर होते

# ग्राहक उपभोक्ता संरक्षण समितीच्या देऊळगाव राजा तालुका सचिव पदी हनीफ शरीफ शेख तर चिखली तालुका सचिव पदी राहुल साहेबराव वाकोडे यांचे नियुक्ती...

जनसंचलन/ सिंदखेडराजा

भारत सरकार नोंदणीकृत माणुसकी सोशल फाउंडेशन संचालित ग्राहकभोक्ता संरक्षण समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष दादासाहेब केदारे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच ग्राहक उपभोक्ता संरक्षण समितीचे बुलढाणा जिल्हाध्यक्ष गंगारामजी उबाळे यांच्या मार्गदर्शनाखाली देऊळगाव राजा तालुका सचिव पदासाठी अंढेरा येथील सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार हनिफ शरीफ शेख तर चिखली तालुका सचिवपदी पांढरदेव येथील सामाजिक कार्यकर्ते राहुल साहेबराव वाकोडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सदर नियुक्त्या ग्राहक उपभोक्ता संरक्षण समितीचे संस्थापक अध्यक्ष दादासाहेब केदारे यांनी दिनांक २५ नोव्हेंबर २०२३ रोजी ऑनलाइन नियुक्तीपत्र देऊन नियुक्ती केली आहे. या समितीच्या



माध्यमातून आमच्यावर जी सचिव या पदासाठी जबाबदारी दिली आहे, त्या पदाचा मान राखून ज्या ग्राहकावर अन्याय होत असेल, ग्राहकांची फसवणूक होत असेल अशा ग्राहकांना योग्य पद्धतीने मार्गदर्शन करून त्यांना न्याय कसा मिळेल यासाठी ग्राहक उपभोक्ता संरक्षण समितीचे संस्थापक अध्यक्ष आदरणीय दादासाहेब केदारे व सर्व सन्मानिय वरिष्ठ पदाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली अहोरात्र कार्यरत राहून



प्रयत्न करू अशी ग्वाही दिली. ग्राहकांची जागृती व समिती सोबत एकनिष्ठ राहून समितीच्या बळकटीकरणासाठी कार्य करत राहू असे यावेळी नवनियुक्त देऊळगाव राजा तालुका सचिवपदी असलेले हनीफ शरीफ शेख व चिखली तालुका सचिव पदी नवनियुक्त राहुल साहेबराव वाकोडे यांनी यावेळी सांगितले. या दोघांच्या निवडीमुळे विविध स्तरातून त्यांच्यावर कौतुकाचा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# थेट कर्ज योजने अंतर्गत लाभ्यार्थ्यांची चिठ्ठीव्दारे निवड

जनसंचलन/बुलढाणा

साहित्य लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळामार्फत प्रकल्प मर्यादा एक लाख रुपये थेट योजने अंतर्गत जिल्हा कार्यालयास ४० एकूण लाभार्थ्यांचे उद्दीष्ट प्राप्त झाले होते. शासन निर्णयानुसार पात्र कर्ज मागणी अर्जामध्ये १२९ पात्र पुरुषांच्या अर्जापैकी २० पुरुष अर्जदाराची निवड करण्यात आली, ४९ पात्र महिलांच्या अर्जापैकी २० महिला अर्जदाराची निवड करण्यात आली. लाभार्थी निवड समितीचे अध्यक्ष तथा निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या मान्यतेनुसार चिठ्ठ्याव्दारे (लॉटरी पद्धतीने) नुकतीच जिल्हाधिकारी कार्यालयात निवड करण्यात आली. सदर बैठकीला लाभार्थी निवड समितीचे अध्यक्ष निवासी उपजिल्हाधिकारी सुरेश थोरात यांच्यासह महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक जे. एम. गाभणे उपस्थित होते. सदर बैठकीला जिल्ह्यातील अर्जदार व सामाजिक कार्यकर्ते सर्व महामंडळाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# गडकिल्ले बनविण्याच्या स्पर्धेतील विजेत्यांचा, बक्षीस व प्रमाणपत्र देऊन केला गौरव!

जनसंचलन/ नांदुरा



या दिवाळीच्या सुट्ट्यांमध्ये माँ. जिजाऊ-सावित्री विचार मंच नांदुरा व इतर समविचारी शिवप्रेमी संघटनांनी नांदुरा शहर व तालुक्यात शिवकालीन गडकिल्ले बनविण्याच्या स्पर्धेचे आयोजन केले होते.या स्पर्धेला सकारात्मक प्रतिसाद देत शहरातील २१ बालमावळ्यांनी सहभाग नोंदऊन अतिशय उत्कृष्ट असे गडकिल्ले बनविले.यामुळे शिवकालीन इतिहासाला एकप्रकारे ऊजाळा मिळाला. माँ जिजाऊ सावित्री विचार मंचच्या वतीने परीक्षकांनी स्पर्धेतील गड किल्ले प्रतिकृतींचे अवलोकन केले असता , त्यातील विशेषत्वाने शिवकालीन रचना व तो किल्ला प्रतिकृति बनवणाऱ्या बालमावळ्यांस त्या बाबत माहिती वजा ईतिहास विचारून , तसेच किल्ले बनवण्या करिता घालून दिलेल्या अटींचे तंतोतंत पालन करून किल्ले बनविणाऱ्या पूर्ण २१ स्पर्धकांना प्रमाण पत्र देऊन गौरवण्यात आले . या मधे प्रथम तीन येणारांना अनुक्रमे रोख बक्षीस रक्कम प्रथम क्रमांक : अर्णव निलेश देशमुख, द्वितीय क्रमांक : चि. प्रेम अशोक पवार, तृतीय क्रमांक : अथर्व विजय गायकवाड यांना जगदीश आगरकर, मिलींद पाटील सर, किशोर देशमुख यांचे वतीने देण्यात आले. तसेच इतर सहभागी स्पर्धकांना प्रोत्साहन पर प्रमाणपत्र वितरित करून सर्व बालमावळ्यांचे कौतुक करण्यात आले. रविवार दि.२६ नोहेंबर रोजी संपन्न झालेल्या कौतुक समारंभाच्या अध्यक्षपदी माँ जिजाऊ-सावित्री विचार मंचचे संयोजक अशोकराव घनोकार, डॉ . शरद पाटील , प्रेमचंद जैन, संतोष गायकवाड, निलेश देशमुख ईत्यादी मान्यवर व्यासपिठावर उपस्थितीत होते. या प्रसंगी डॉ. शरद पाटील यांनी ऊपस्थीतांना मार्गदर्शन करून बालमावळ्यांचे अभिनंदनपर कौतुक केले.

## नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्या - जयश्रीताई शेळके

# विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांना दिले निवेदन

जनसंचलन/बुलढाणा

अवकाळी पावसाने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यात यावी, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या सचिव ॲड. जयश्रीताई शेळके यांनी ३० नोव्हेंबर रोजी विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली. जिल्ह्यामध्ये दोन दिवसापूर्वी आलेल्या अवकाळी पावसाने मोठ्या प्रमाणात पिकांचे नुकसान झाले आहे. तसेच घरांचीही पडझड झाली आहे. गुरुवारी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी सिंदखेडराजा, देऊळगावराजा तालुक्यात गारपिट आणि वादळामुळे झालेल्या नुकसानीची पाहणी केली. यावेळी जयश्रीताई शेळके यांनी वडेट्टीवार यांच्यासोबत जिल्ह्यातील नुकसानाची पाहणी करुन चर्चा केली. जिल्ह्यात २७ व २८ नोव्हेंबर रोजी अवकाळी पावसाने थैमान घातले. विजांचा कडकडाट, गारपीट, वादळी वाऱ्याने जिल्ह्यातील सर्वच १३ तालुक्यांमध्ये अक्षरशः धुमाकूळ घातला. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून मिळालेल्या माहितीनुसार जिल्ह्यात २९ मंडळात अतिवृष्टी झाली. अवकाळी पावसामुळे जिल्ह्यातील ३६ हजार हेक्टर शेतीचे अतोनात नुकसान झाले आहे. तूर, हरभरा, कपाशी, भाजीपाला, संत्रा, मोसंबी, पेरु, द्राक्ष, डाळींब, तूर या पिकांना चांगलाच फटका बसला. सर्वाधिक नुकसान हे नांदुरा तालुक्यात झाले. जिल्ह्यातील २८७ गावे बाधित झाली आहेत. पशुधनाची सुद्धा मोठी हानी झाली आहे. वीज पडून ८६ मेंढ्या दगावल्या तर एक बैल ठार झाला. तब्बल ५२ घरांची पडझड झाली आहे. अवकाळीने जिल्ह्यातील १००६



शेडनेट उध्वस्त झाले आहेत. भाजीपाला व इतर पिके घेण्यासाठी देऊळगाव राजा, मेहकर, लोणार, सिंदखेड राजा तालुक्यात शेतकऱ्यांनी शेडनेट व पॉलिहाऊसची उभारणी मोठ्या प्रमाणात केली आहे. यासाठी लाखोंचा खर्च देखील केला आहे. मात्र अवकाळी पावसाने शेडनेटला प्रचंड तडाखा दिला. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तत्काळ आर्थिक मदत देऊन दिलासा द्यावा, अशी मागणी जयश्रीताई शेळके यांनी केली.

# ५०० आठवडे सेवा देणाऱ्या सेवेकऱ्यां तर्फे अन्नदान सेवेकऱ्यांचा सत्कार सोहळा संपन्न....

जनसंचलन/बुलडाणा

शासकीय रुग्णालयात सतत पाचशे आठवडे दर गुरुवारी भरती असलेल्या पेशंटच्या नातेवाईकांसाठी अन्नदान करण्यात येते. हा उपक्रम अखंडीत व उत्स्फुर्तपणे सुरु आहे. अन्नदानात सेवा देणाऱ्यांचा सत्कार आज मा. आमदार संजय गायकवाड, सौ. जयश्रीताई शेळके, सिध्दार्थ शर्मा, सोहम झाल्टे, उमेश मुंदडा, मधुकर गायके यांच्या हस्ते गौरव चिन्ह व प्रसाद देवून करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी विजय वैद्य, गोपालसिंग राजपूत, संदीप बिलारी, समाधान वावगे, सौ. वाणी रुपराव उज्जैनकर यांनी पाहुण्यांचे शाल श्रीफळ देवून स्वागत केले. या प्रसंगी उघड्यावर अन्नदान होत आहे हे पाहून धर्मवीर आमदार संजय गायकवाड यांनी अद्यावत सोयींनी युक्त शेड (निवारा) बांधण्यासाठी ५० लाखांचे सहाय्य करण्याचे घोषीत केले. बुलडाणा अर्बनचे अध्यक्ष राधेश्याम चांडक यांनी अन्नदानाचा हा उपक्रम फक्त गुरुवार पुरता न ठेवता दररोज केल्यास बुलडाणा अर्बन सर्वतोपरी सहाय्य करेल असा संदेश पाठविला. डॉ. सुकेश झंवर यांनी अन्नदानाच्या या महान यज्ञाला शुभेच्छा दिल्या व सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. आतापर्यंत अन्नदानाच्या ५०० आठवड्यासाठी ७५ लक्ष रुपये खर्च झाला १० वर्ष सेवा देणारे सेवेकरी यांना पाहुण्यांच्या हस्ते गौरव चिन्ह देण्यात आले. या सत्कारमुर्तीमध्ये सर्वश्री विजय वैद्य, सुरेश गट्टाणी, रुपराव उज्जैनकर, संदीप बिलारी, सुधीर घगरे, संजय चोपडे, गोपालसिंग राजपूत, लक्ष्मणराव सांगळे, तिलोकचंद चांडक, बजरंग सोनी, नंदकिशोर बोंडे, कुमार कोलवडकर, पांडुरंग क-हाळे, श्री व सौ. वाणी, सुनिल सुर्यवंशी, पांडुरंग फिसके, सुधाकर कांबळे, प्रकाशचंद्र पाठक, राहुल रायपूरे, रमेश पवार, दिलीप राठोड, मनोज राजुरे, अशोक पांचाळ, बाबुराव चव्हाण, गजानन क्षिरसागर, सिध्देश्वर सपकाळ, प्रविण सावजी, गजेंद्रसिंग राजपूत, विजय कुळकर्णी, विनोद चांडक, सईदभाई ठेकेदार, मुरलीधर निनावे, मकरंद जोशी, अली ठेकेदार इत्यादीचा समावेश होता. या सर्वांचे गौरव चिन्ह व थैल्या मधुकर गायके गणेश प्रिंटर्स यांच्या सौजन्याने देण्यात आल्या. आमदार गायकवाड, सिध्दार्थ शर्मा, सौ. जयश्री शेळके, सोहम झाल्टे, उमेश मुंदडा व माहेश्वरी युवामंच यांनी उपस्थितांना अन्नदान केले सर्व सेवेकरी उपस्थित हाते. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन प्रा. प्रकाशचंद्र पाठक यांनी केले.



# अडीच वर्षीय बालिकेवर अतिप्रसंग करून जिवे मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या समाज कंटकाला तात्काळ फाशी द्याः- सकल मराठा समाजाची मागणी

जनसंचलन/ नांदुरा

छत्रपती शिवाजीराजे यांची पुरोगामी विचारधारा असलेल्या महाराष्ट्रातील राजमाता जिजाऊंच्या मातृतीर्थ बुलढाणा जिल्ह्यातील नांदुरा तालुक्यातील तरवाडी गावात दि. २३नोव्हेंबर २०२३ रोजी दुपारच्या वेळी एका नराधमाने गावातील एका निरागस अडीच वर्षीय बालिकेला चॉकलेटच्या बहाण्याने एका बंद व पडक्या घरात नेऊन तिच्यावर अनैसर्गिक अत्याचार करून तिला रक्तबंबाळ केले. दरम्यान ती बेशुद्ध पडली त्यानंतर तिला दगडाने ठेचुन ठार मारण्याचा प्रयत्न केला. बालिका घरी परत आली नसल्याने तिची शोधाशोध केली असता ती पडक्या घरात रक्तबंबाळ व बेशुद्ध अवस्थेत आढळली. दरम्यान तिला बुलढाणा येथे सामान्य रुग्णालयात दाखल केले तेव्हा तिच्यावर बलात्कार झाला असल्याचे समजले. ही घटना माणुसकीला काळीमा फासणारी असुन समाजमन सुन्न करणारी आहे. आम्ही या घटनेचा जाहीर निषेध करतो. व मा. गृहमंत्री महोदय, आपणास विनंती करतो की, या घटनेची तात्काळ दखल घेऊन विशेष सरकारी वकील यांची नियुक्ती करुन ही केस जलदगती न्यायालयात चालवुन आरोपीला कठोर अशी फाशीची शिक्षा मिळावी. जेणे करुन समाजात भविष्यात अशी निच व दुष्ट प्रवृत्ती उदयास येणार नाही. सदर निवेदनाची तात्काळ दखल घ्यावी.या आशयाचे निवेदन सकल मराठा समाज नांदुरा शहर व तालुक्याच्या वतीने राज्याचे गृहमंत्री मा.देवेंद्र फडणवीस यांना देण्यात आले.यावेळी बहुसंख्य सकल मराठा समाज उपस्थित होता.सदर निवेदनाच्या प्रतीलीपी मा. पालकमंत्री, बुलढाणा जिल्हा,मा. जिल्हाधिकारी बुलढाणा, बुलढाणा. मा. जिल्हा पोलीस अधिक्षक बुलढाणा, मा. राष्ट्रीय महिला आयोग, बुलढाणा, मा. ठाणेदार पोलीस स्टेशन बोराखेडी ता.मोताळा जि.बुलढाणा. यांना देण्यात आल्या.

# शरद पवारांनीच अध्यक्षपदाचा राजीनामा मागं घेण्यासाठी आंदोलन करायला सांगितलं- अजित पवारांचा खळबळजनक दावा...

वृत्तसंस्था/रायगड

राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाचं दोन दिवसीय अधिवेशन रायगडमधील कर्जत येथे पार पडलं. यावेळी अजित पवार यांनी त्यांच्या समर्थक लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केलं. अजित पवारांनी शरद पवार यांनी राष्ट्रीय अध्यक्षपदाचा राजीनामा दिला त्यावेळी काय घडलं? हे सांगितलं. शरद पवारांकडून आम्हाला गाफील ठेवलं जात होतं, असं अजित पवार म्हणाले. राजीनामा मागं घेण्यासाठी शरद पवारांच्या आदेशानेचं आंदोलनं सुरु होती, असं देखील अजित पवार म्हणाले. आम्हाला सातत्यानं गाफील ठेवलं गेलं. मी मागं जात नाही पण यामध्ये प्रफुल पटेल, सुनील तटकरे आणि काही प्रमुखापासून सगळ्या गोष्टी सर्वांना माहिती आहेत. प्रफुल पटेल, अजित पवार, छगन भुजबळ, सुनील तटकरे, जयंत पाटील, अनिल देशमुख, रामराजे नाईक निंबाळकर, दिलीप वळसे पाटील हसन मुश्रीफ, धनंजय मुंडे आम्ही दहा बारा जण होतो. देवगिरीला बसलो होतो. आम्ही काय करायचं असा विचार करत होतो. थेट साहेबांना सांगितलं तर काय वाटेल याचा विचार करुन सुप्रिया सुळेंना घरी बोलावलं होतं. त्यांना सांगितलं की लोकशाहीत बहुमताला आदर द्यावा लागतो. तरच संघटना पुढे जाते. त्यांनी सात दिवसांचा वेळ मागितला, शरद पवारांना कन्व्हिन्स करते, असं त्या म्हणाल्या, असं अजित पवारांनी सांगितलं.आम्ही सात ते दहा दिवस थांबलो. जयंत पाटील आणि अनिल देशमुख होते. सरकारमध्ये जायला हवं, अल्पसंख्यांक समाजाचा विचार झाला पाहिजे. स्थगित्या उठल्या पाहिजेत या भूमिकेतून शरद पवार यांच्याकडे गेलो. पुन्हा आम्ही यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानला जाऊन भेटलो. वेळ जातोय एकदा काय ते निर्णय घ्या, असं सांगितलं. १ मेचा दिवस होता, मला बोलावून सांगितलं की सरकारमध्ये जावा मी अध्यक्षपदाचा राजीनामा देतो, असं सांगितलं. २ तारखेला कार्यक्रम होता, कुणाला काही माहिती नव्हतं, घरातील चार जणांना राजीनाम्याबाबत माहिती होतं. पंधरा जणांची समिती झाली. शरद पवार त्यानंतर घरी गेले, असं अजित पवार म्हणाले. शरद पवारांनी आनंद परांजपे आणि जितेंद्र आव्हाड यांना बोलावून घेतलं, युवक आणि महिला आघाडीच्या लोकांना यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान बाहेर आंदोलन करायला सांगितलं होतं. तिथं काही जण आंदोलन करत होते, तिथं एकही आमदार नव्हता, जितेंद्र आव्हाड सोडले तर असं अजित पवार म्हणाले.तुम्ही आम्हाला गाफील ठेवत होता का? एवढं सगळं झाल्यावर १२ ऑगस्टला रोजी मला एका उद्योगपतीनं जेवायला बोलावलं. तिथं जयंत पाटील, शरद पवार आणि मी असेन, असं त्या उद्योगपतीनं सांगितलं. सुरळीत करायचं नव्हतं तर कशा करता गाफील ठेवायचं, असा सवाल अजित पवार यांनी केला.



# विदर्भात २.२० लाख हेक्टरमधील पिके उद्ध्वस्त, बळीराजा मदतीच्या प्रतिक्षेत...



वृत्तसंस्था/नागपूर

विदर्भात दोन दिवस झालेल्या अवकाळी पावसामुळे कापूस काळवंडला. धानाच्या कडपा शेतात साचलेल्या पाण्यावर तरंगल्या. संत्रा, तूर आणि भाजीपाला मातीमोल झाला आहे. प्रशासनाकडून पंचनामे केले जात असले तरी विदर्भातील सुमारे २ लाख २० हजार २६१ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज समोर आला आहे. वर्धा जिल्ह्यातील आकडे अजूनही पुढे आलेले नाहीत. सरकारने तातडीने पंचनामे करून मदत जाहीर करावी, अशी मागणी आहे. यवतमाळ जिल्ह्याच्या सात तालुक्यांतील १ लाख २६ हजार ४३७ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. इतर नऊ तालुक्यांत सर्वेक्षण केले जात आहे. यवतमाळ, बाभूळगाव, घाटंजी, वणी, राळेगाव, कळंब व पुसद तालुक्यातील पंचनामे पूर्ण झाले आहेत. उमरखेड, महागाव, दिग्रस, दारव्हा, नेर, आर्णी, केळापूर, मारेगाव व झरी जामणी तालुक्यातील पंचनामे सुरू आहेत. सर्वाधिक नुकसान घाटंजी तालुक्यात झाले आहे. तालुकानिहाय नुकसानीचा विचार करता पुसद ३०, ३९२ हेक्टर, यवतमाळ १,३८४ हेक्टर, घाटंजी ३१,२२५ हेक्टर, वणी २८,१८३, राळेगाव २७,७२०, बाभूळगाव २,६७९ हेक्टर तर कळंबमधील ४,८६३ हेक्टरचा समावेश आहे.नागपूर जिल्ह्याच्या मौदा आणि पारशिवनी अशा दोन तालुक्यांच्या नुकसानीचा प्राथमिक अहवाल प्रशासनाने जाहीर केला आहे. यात १३७ गावांतील सुमारे २ हजार २४८ शेतकऱ्यांच्या १ हजार ९३० हेक्टरवर नुकसान झाल्याचे अहवालात नमूद आहे. भंडारा जिल्ह्यात दोन दिवस झालेल्या अवकाळी पावसामुळे २,५३२ हेक्टरवरील धान पीक बाधित झाले आहे. यामध्ये भंडारा तालुक्यात सर्वाधिक ९७० हेक्टर, मोहाडी तालुक्यात ९५३, पवनी १२, तुमसर ७२, साकोली ७५, लाखनी तालुक्यातील ४५० हेक्टरचा समावेश आहे. नुकसानीचे सर्वेक्षण सुरूच असल्याने आकडे वाढण्याची शक्यता आहे. गोंदिया जिल्ह्यात २,७७५ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. या पावसाचा ४०५ गावांतील ५ हजार ९३३ शेतकऱ्यांना फटका बसला आहे. चंद्रपूर जिल्ह्यात अवकाळी पावसामुळे १३ हजार ३३५ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज कृषी विभागाने वर्तविला आहे. यात चंद्रपूर ४७, बल्लारपूर दोन, मूल १५ तर पोंभूर्णा तालुक्यातील ३५ अशा एकूण ९९ गावांचा समावेश आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची संख्या ३२ हजार ८७५ इतकी आहे. गडचिरोली जिल्ह्यात आरमोरी आणि भामरागड तालुक्यात ३० हेक्टवरील धान पीक बाधित झाल्याचा प्रशासनाचा अहवाल आहे. अकोला जिल्ह्यात सुमारे ४ हजार ६०८ हेक्टरवरील तर बुलढाणा जिल्ह्यात ३८३ गावांतील ३६ हजार ९५ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. यासोबतच २२२ गुरांचा मृत्यू, १२ घरांची पडझड झाली आहे.वर्धा जिल्ह्याच्या काही भागांत १० ते २० मिलिमीटर पाऊस झाला. काही भागात ३० मिमी पावसाची नोंद झाली. त्यामुळे कुठेही तूर्तास ३३ टक्क्यांहून अधिक नुकसान झालेले नाही. अजूनही नुकसानग्रस्त भागात पंचनामे केले जात आहेत. हे पूर्ण झाल्यानंतर नुकसानीचा आकडा कळू शकणार असल्याची माहिती कृषी विभागातील सूत्रांनी दिली. खरीप हंगामात अपुरा पाऊस आणि रब्बी हंगामात अवकाळी पाऊस, वादळी वाऱ्याचा मारा सहन केल्यानंतर वाशीम जिल्ह्यात धुक्याची चादर पसरली आहे. यात उरलेल्या पिकांचेही नुकसान होण्याचा धोका व्यक्त होत आहे. तुरीला याचा अधिक फटका बसणार आहे. जिल्ह्यात जवळपास ५० हजार हेक्टरवर तुरीची लागवड झाल्याचा अंदाज आहे. धुक्यामुळे हा फुलोर गळून पडण्याचा धोका शेतकऱ्यांनी वर्तविला आहे. गुरुवारी जाहीर अहवालात वाशीम जिल्ह्यातील एका तालुक्यात ४६२ हेक्टरवर नुकसान झाल्याचे प्रशासनाने म्हटले आहे. पण, हा नेमका कुठला तालुका याचा उल्लेख अहवालात नाही.

# पालकमंत्री दिलीप वळसे पाटील रविवारी बुलडाणा जिल्हा दौऱ्यावर

जनसंचलन/बुलढाणा

जिल्ह्यात गारपीट व अवकाळी पावसामुळे शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, पालकमंत्री दिलीप वळसे-पाटील रविवारी जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्यामध्ये जिल्ह्यातील नुकसानग्रस्त भागाची पाहणी करून ते नुकसानीचा आढावा घेणार आहेत.

पालकमंत्री दिलीप वळसे पाटील हे रविवारी छत्रपती संभाजीनगर येथून सकाळी ९ वाजता सिंदखेड राजा तालुक्यातील सावरगाव माळ येथे गारपीट व अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानग्रस्त भागाची पाहणी करतील. त्यानंतर देऊळगाव राजा तालुक्यातील गोळेगाव, गिरोली आणि असोला जहागीर या गावातील नुकसानग्रस्त भागाची पाहणी करतील. सिंदखेड राजा तालुक्यातील पळसखेड चक्का येथील नुकसानग्रस्त भागाची पाहणी केल्यानंतर ते गारपीट व अवकाळी पावसामुळे बाधित शेतपिकांच्या नुकसानीसंदर्भात दुपारी १२.३० वाजता सिंदखेडराजा येथील पंचायत समिती सभागृहामध्ये जिल्हा यंत्रणेच्या संबंधित विभाग प्रमुखांसोबत आढावा घेतील.



त्यांची दुपारी १.३० ते २.३० वाजेदरम्यान राखीव वेळ असेल. त्यानंतर ते सोईनुसार सिंदखेड राजा येथून छत्रपती संभाजीनगरकडे प्रयाण करतील.



बॉक्स

वृत्तपत्र आणि चांगली माणसं लगेच कळत नाही त्याला वाचाव लागत

जिल्हावासियांचा बुलंद आवाज

# दैनिक निडर निर्भिड जनसंचलन

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

## जाहिरात द्या व प्रचंड प्रतिसादाचा अनुभव घ्या...



**व्यवसायिक,प्रतिष्ठाने, Wanted, पाहिजेत, ऑफर, सेल इत्यादी**

| Size | 1 Month | 15 Day | 7 Day | Hight | Width |
|---|---|---|---|---|---|
| 8x8 cm | 5000/- | 3500/- | 2000/- | 8 cm | 8 cm |
| 5x8 cm | 3500/- | 2200/- | 1500/- | 5 cm | 8 cm |
| 5x8 cm | 3500/- | 2200/- | 1500/- | 5 cm | 23 cm |

**एक दिवसाची जाहिरात: वाढदिवस शुभेच्छा, उद्घाटन, शुभारंभ, समारंभ, शुभविवाह इ.**

**One Day**

Full Page= 8000/-

1/2 Page= 5000/-

| Price | Hight | Width |
|---|---|---|
| 2600/- | 12 cm | 12 cm |
| 1800/- | 8 cm | 10 cm |
| 1300/- | 8 cm | 8 cm |

T&C Apply

सुचना, नावात बदल, टी.सी. किंवा कागदपत्रे हरविली आहेत तसेच जाहीर प्रकटन इत्यादी केवळ ३५०/- रु.

- जाहिरातीचे मॅटर तयार नसल्यास डिझाईनसाठी अतिरिक्त २००/- रुपये चार्ज पडतील.
- पूर्ण रक्कम ॲडव्हान्स दिल्यास एकुण रकमेत ५ टक्के सुट
- प्रथम पानावरील जाहिरातीसाठी १० टक्के अतिरीक्त चार्ज पडेल

विशेष सूचना- आपल्या जाहिराती आमच्या सोशल मिडीया अकाऊंटला ही नि:शुल्क झळकतील

न्यायालय तसेच धर्मदाय आयुक्तांच्या जाहीर नोटीस फक्त ५०० रुपये

अधिक माहितीसाठी संपर्क:

अजय राजगुरे-9922359674

ऑफिस नं.-9129582958

पत्ता- शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स कारंजा चौक,बुलडाणा

Mail Id: jansanchlan@gmail.com